महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
सामान्य प्रशासन विभाग, प्रकाशगड,
४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दूरध्वनी क्र. २६४७५९९५ / २६४७४२११
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

जा.क्र.: मु.म.व्य.(क)/साप्रवि/वेतन व देयक/ ८९३१ दिनांक : १९-०३-२०११

# परिपत्रक

**विषय : कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या कर्ज वसुलीसंदर्भात.**
**संदर्भ :कामगार विभाग परिपत्रक क्र.काऔसंविभाग/अ/२८०४४, दि.२४/८/२००६.**

***********

**प्रस्तावना :**

असे निदर्शनास आले आहे की, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. मधील बहुतांश कर्मचारी, एकापेक्षा अनेक कर्मचारी सहकारी पतसंस्थांचे सभासद आहेत. असे सभासद, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम ४५ अन्वये, एकावेळी कोणत्याही एकाच पतसंस्थेमार्फत कर्ज घेऊ शकतात. तथापि, एका कर्मचाऱ्याला अशा विविध कर्मचारी सहकारी पतसंस्था एकाचवेळी कर्ज मंजूर करतात व त्याचा परिणाम म्हणून कर्जाचे हप्ते व त्यावरील व्याज, संस्थेचे सभासद शुल्क इत्यादी, बाबी कर्मचाऱ्याच्या मासिक वेतनातून वसुली करण्यासाठी, विविध पतसंस्था वसुली पत्रकान्वये कळवितात. परिणामी, कर्मचाऱ्याच्या मासिक वेतनातून पतसंस्थेने दाखविलेली रक्कमांची कपात झाल्यानंतर काही कर्मचाऱ्यांना, 'वेतन प्रदान अधिनियम १९३६' मधील तरतुदी अन्वये २५ टक्केही वेतन हाती प्राप्त होत नाही. त्यामुळे कर्मचारी कर्जबाजारी होऊन त्याची क्रयशक्ती / कार्यशक्ती खचून कंपनीच्या दैनंदिन कामकाजावर त्याचा विपरित परिणाम झाल्याचे आढळते.

यासंदर्भात सक्षम प्राधिकारी यांच्या आदेशान्वये खालील सूचना निर्गमित करण्यात येत आहेत :-

१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम ४५ अन्वये कर्मचाऱ्याला एकाच पतसंस्थेकडून कर्ज घेणे व त्याची वसुली महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम ४९ प्रमाणे कर्मचाऱ्याच्या पगारातून, वेतन प्रदान अधिनियम १९३६, कलम ७ उपकलम ३ (१) मधील तरतुदीनुसार २५ टक्के वेतन हाती प्राप्त होईल अशा पध्दतीने करण्यात येईल व त्यातल्यात्यात प्रथम ज्या कर्मचारी सहकारी पतसंस्थेकडून कर्ज घेतलेले असेल त्याच पतसंस्थेची वसुली करण्यात येईल.

२) आहरण व संवितरण (Drawing & Disbursement Officers) अधिकाऱ्यांनी कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यास अथवा मृत पावल्यास त्याच्या वारसास देय असलेल्या रकमेतून कर्मचारी सहाकारी पतसंस्थेची कर्ज वसुली करु नये व त्याची वसुली संबंधित पतसंस्थेने त्यांच्या स्तरावर संबंधित कर्मचाऱ्यांकडून अथवा मृत कर्मचाऱ्याच्या वारसांकडून परस्पर करावी. त्यासाठी म.रा.वि.वितरण कंपनी मर्या. यांचे कार्यालय जबाबदार रहाणार नाही.

३) HRMS (मानव संसाधन व्यवस्थापन कार्यपध्दती) पगारपत्रक पध्दतीमार्फत कर्मचाऱ्याला कमीतकमी २५% टक्के पगार त्याच्या हाती मिळण्याची तरतूद केली असल्याने प्रथम संविधानिक कायद्यान्वये आवश्यक असलेली वसुली प्राधान्याने करण्यात येईल. त्यानंतर वेतनातून एका कर्मचारी सहकारी पतसंस्थेची कपातीसहीत एकूण कपात, वेतनाच्या ७५ टक्क्यापेक्षा अधिक होणार नाही याची दक्षता घेऊन कर्मचाऱ्यास किमान २५ टक्के वेतन मिळेल याची खातरजमा झाल्यावरच कर्मचाऱ्याची पतसंस्थेची कर्जाची रक्कम वसूल करण्यात यावी.

४) कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यास अथवा मृत पावल्यास, कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या कर्जाच्या वसुलीची जबाबदारी संबंधित पतसंस्थेची राहील. तसेच संबंधित कर्मचाऱ्याच्या अंतिम देयकातून त्याची वसुली करण्यात येणार नाही. सदर कर्जाची रक्कम पतसंस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम ४९ मधील तरतुदी अन्वये वसुली करावी.

सर्व आहरण व संवितरण (Drawing & Disbursement Officers) अधिकाऱ्यांना निर्देशित करण्यात येते की, वरील बाबींची अंमलबजावणी नियमाद्वारे काटेकोरपणे करण्यात यावी, अन्यथा संबंधित कार्यालय प्रमुख त्यास जबाबदार राहतील.

१०/३/२०११

मुख्य महाव्यवस्थापक (क)

प्रती :

**प्रेषण यादीनुसार विभागीय स्तरापर्यंत रवाना.**